**ठळक बातम्या**

- १८ व्या खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचं मुंबईत उद्धाटन / भारतात परंपरा, नवोन्मेष, अध्यात्म, विज्ञान, औत्सुक्य आणि सर्जनशीलता हातात हात घालून चालतात, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- वादग्रस्त न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्याविरोधात महाभियोग चालवण्यासाठी लोकसभेचे सभापती ओम बिरला यांच्याकडून त्रिसदस्यीय समितीची घोषणा

- चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- किरकोळ चलनफुगवट्याचा दर ८ वर्षांच्या नीचांकी पातळीवर

**आणि**

- महाराष्ट्रात १५ हजार पोलीस शिपायांची भर्ती करायला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

**<><><><><>**

भारतात परंपरा आणि नवोन्मेष, आध्यात्मिकता आणि विज्ञान, औत्सुक्य आणि सर्जनशीलता हातात हात घालून चालतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. १८ व्या खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचं औपचारिक उद्धाटन आज मुंबईत झालं. या कार्यक्रमाला प्रधानमंत्री संबोधित करत होते. भारतीय अनेक शतकांपासून  अवकाशाचं निरीक्षण करत आले आहेत. पाचव्या शतकात आर्यभट्ट यांनी शून्याचा शोध लावला, पृथ्वी ही तिच्या अक्षाभोवती फिरते हे त्यांनीच सांगितलं, याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी आवर्जून केला. विज्ञानाच्या क्षेत्रात भारताने केलेली प्रगती आणि विविध प्रयोगाविषयी सांगत प्रधानमंत्र्यांनी कौतुक केलं. यात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचं प्रधानमंत्री मोदी यांनी स्वागत केलं.

या स्पर्धेत ६४ देशांमधून एकंदर २८८ विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांना पदावरुन हटवण्यासाठी महाभियोग चालवण्याचा प्रस्ताव आज लोकसभेत सादर झाला. सभापती ओम बिरला यांनी सांगितलं की, महाभियोग चालवण्याचे १४६ सदस्यांचे प्रस्ताव सभागृहाला मिळाले आहेत....

**- - होल्ड- बाईट- ओम बिरला - -**

न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरच्या आरोपांचं गंभीर स्वरुप लक्षात घेऊन त्या प्रकरणी चौकशीसाठी तीन सदस्यांच्या समितीची घोषणा सभापतींनी केली. त्यात सर्वोच्च न्यायलयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार, मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश महिंद्र मोहन श्रीवास्तव आणि ज्येष्ठ विधिज्ञ बी. व्ही. आचार्य यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं आज ओदिशा, पंजाब आणि आंध्र प्रदेशातल्या ४ हजार ५९४ कोटी रुपयांच्या चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बातमीदारांना ही माहिती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आजच्या बैठकीत मंत्रिमंडळानं हा निर्णय घेतला.

लखनऊ मेट्रो फेज-१बी प्रकल्पालाही मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. या प्रकल्पासाठी ५ हजार ८०१ कोटी रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित आहे. अरुणाचल प्रदेशातल्या शि योमी जिल्ह्यात उभारण्यात येणाऱ्या तातो-२ जलविद्युत प्रकल्पाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे.

**<><><><><>**

लोकसभेत आज भारतीय बंदरे विधेयक २०२५ मंजूर झालं आहे. बंदरांसंबंधित सर्व कायद्यांना एकत्र आणून एकात्मिक बंदर विकास साधणं, तसंच

व्यवसायसुलभता आणत देशाच्या किनारपट्टीचा सर्वोत्तम वापर साधण्याचं कार्य या विधेयकामुळे साध्य होईल. भारतीय बंदरे कायदा १९०८ आता कालबाह्य झाल्यामुळे त्यात आधुनिक पर्यावरणरक्षक नियम तसंच तंटे सोडवण्यासाठी कार्यक्षम धोरण नव्हते, या विधेयकामुळे भारताचं सागरी वाहतूक क्षेत्र आधुनिकतेकडे वाटचाल करू लागेल असं केंद्रीय बंदरे आणि सागरी वाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना म्हटलं.

लोकसभेत आज खाणी आणि खनिजे विकास आणि नियमन विधेयक मंजूर झालं.

राज्यसभेत आज नवं आयकर विधेयक, कर आकारणी विधेयक, राष्ट्रीय क्रीडा सुशासन विधेयक २०२५ तसेच राष्ट्रीय उत्तेजक पदार्थ विरोधी विधेयक २०२५ ही विधेयकं मंजूर करण्यात आली. याआधी ही विधेयकं लोकसभेत मंजूर झाली होती. राष्ट्रीय क्रीडा सुशासन विधेयकामुळे क्रीडा महासंघाची कार्यक्षमता वाढेल तसंच त्यांच्या निवडणुका पारदर्शक पद्धतीने होण्यासाठी मदत मिळेल असं केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय उत्तेजक पदार्थ विरोधी विधेयक २०२५ द्वारे राष्ट्रीय उत्तेजक पदार्थ विरोधी कायदा २०२२ मध्ये सुधारणा केली असून यात राष्ट्रीय उत्तेजक पदार्थ विरोधी महासंघाचे अधिकार वाढवले आहेत.

<><><><><>

‘एक देश- एक निवडणूक’ विधेयकावर संयुक्त संसदीय समितीचा अहवाल सादर करण्यासाठी लोकसभेनं मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार हा अहवाल आता संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यातल्या पहिल्या दिवशी सादर करता येईल. भाजपा खासदार पी पी चौधरी यांनी आज लोकसभेत हा प्रस्ताव मांडला होता.

<><><><><>

किरकोळ चलनफुगवट्याचा दर जुलैमधे कमी होऊन एक पूर्णांक ५५ शतांश टक्क्यांच्या नीचांकी पातळीवर पोहोचला. जून महिन्यात किरकोळ चलनफुगवट्याचा दर २ पूर्णांक १ दशांश टक्के होता. जुलैमधे ग्रामीण भागात महागाई दर १ पूर्णांक १८ शतांश टक्के होता तर शहरी भागात २ पूर्णांक ५ शतांश टक्के होता. अन्नपदार्थांच्या किमती तसंच वाहतुकीवरचा खर्च कमी झाल्यानं महागाई कमी झाली, तसंच शिक्षणावरचा खर्चही कमी झाला आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र पोलीस दलात सुमारे १५ हजार शिपाई भर्ती करायला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राज्यातल्या रास्त भाव दुकानदारांच्या नफ्यात वाढ करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला. आता या दुकानदारांना प्रतिक्विंटल दीडशे ऐवजी १७० रुपये फायदा मिळेल. सोलापूर - पुणे मुंबई हवाई  मार्गासाठी व्यापारी तूट भरुन काढण्यासाठी निधी देण्याचा निर्णयही आज झाला. याशिवाय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाअंतर्गत येणाऱ्या महामंडळांतर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध कर्ज योजनेतल्या जामीनदारीच्या अटी शिथिल करायला आणि शासन हमीला पाच वर्षांची मुदतवाढ द्यायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><><>**

देशाच्या एकतेचं निदर्शक असलेल्या हर घर तिरंगा अभियानानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत. ठिकठिकाणी तिरंगा ध्वज घेऊन पदयात्रा काढण्यात येत आहेत तसंच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत.

**पनवेल** महानगर पालिकेमार्फत हर घर तिरंगा’ मोहिम विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबवली जात आहे. या मोहिमेंतर्गत नुकतीच महापालिका कार्यक्षेत्रातल्या विविध शाळा महाविद्यालयांमध्ये पत्रलेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, प्रतिज्ञा घेण्यात आली.

**नाशिक** जिल्ह्यात काढलेल्या तिरंगा रॅलीत सहभागी झालेल्या चंचल ठाकूर हिने आपलं मनोगत व्यक्त केलं

**होल्ड.. बाईट - चंचल ठाकूर**

**<><><><><>**

निशस्त्रीकरण, अण्वस्त्र प्रसारबंदी आणि निर्यात नियंत्रण या विषयावर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात चर्चेची सातवी फेरी आज  नवी दिल्लीत झाली. आण्विक, रासायनिक, जैविक निशस्त्रीकरण आणि अण्वस्त्र प्रसारबंदी तसंच कृत्रिम बुद्धीमत्तेसह पारंपरिक शस्त्र आणि निर्यात नियंत्रण आदी क्षेत्रांबाबत दोन्ही देशात चर्चा झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत न्यूयॉर्क इथे भरलेल्या संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सागरी सुरक्षेवरच्या चर्चेदरम्यान भारताने खुल्या सागरी व्यवस्थेसाठी आपली वचनबद्धता पुन्हा एकदा स्पष्ट केली. भारताचं प्रतिनिधीत्व करताना परराष्ट्र सचिव तन्मय लाल यांनी भारताच्या महासागर सुरक्षा संबंधित दृष्टिकोनाविषयी बोलताना व्यापार, ऊर्जा आणि दळणवळणासाठी सागरी मार्गांचं धोरणात्मक महत्त्व अधोरेखित केलं. यावेळी त्यांनी संबंधित क्षेत्रातली प्रशासकीय आव्हानं तसंच भारताच्या सक्रिय उपाययोजनां विषयीही माहिती दिली.

//<><><><><>//